राष्ट्र निर्माण पीडितांच्या समस्या व विविध घटनांवर निष्पक्ष नाईक प्रवृत्ती व संविधानिक मार्गाने निराकरण व प्रसंगी न्याय भूमिकेवर तटस्थ संघर्ष वेळप्रसंगी प्राणची सुद्धा अव्होती आपल्या कर्तव्यनिष्ठ भावनास... व... बलिदानास आम्ही भारतीय समाज अविस्मरणीय. आहोत. आपले अनंत आभारी आहोत.

माननीय पत्रकार बांधव माझी समस्या ही आहे की मी न्याय तथा अधिकारी व संविधानिक लढा. संघर्ष इच्छुक आहोत त्याबद्दल आपले पाठबळ व आपले सहकार्य आम्हास अनंत लाभो ही माझी अनंत अपेक्षा व आपणास विनंती आहे.

मी आपला सदैव अनंत आभारी आहों मी आभार अभिनंदन व्यक्त करत नाही कारण तुमचा आभाराचे ओझे सदैव वाहातच राहील

दिनांक 11/12/2020 ला 17 वर्षीय साहिल हसतखेडट जिल्हा सामान्य रुग्णालयात फक्त रक्त घेण्यास गेला होता साहिल सिकल विटा टीएल याचा रुग्ण होता वर्ष 2012 ते वर्ष 2020 पर्यंत त्याला रक्त लागले नव्हते आठ वर्षांनी त्याला रक्त देण्याची गरज भासली. मेडिकल सायन्सच्या दृष्टीने दैविक चमत्कार होता. कारण सिकल आरबीसीचे जीवन वीस दिवसाचे असते सामान्य व्यक्तीचे 120 दिवसाचे. त्यावेळी त्याच्या कुठल्याही तपासण्या केएफटी आयबीटीसी कोणत्याही केल्या नाहीत. डॉक्टरांच्या अनुपस्थितीत त्याला रक्त दिल्या गेले. कोरोना काळ सुरू असता अत्यंत आजारी रुग्णाच्या शेजारी एकाच बेडवर वार्ड क्रमांक 6 मध्ये भरती त्याला केल्या गेले. तिथे अशा रुग्णांकरिता डे केअर सेंटर उपलब्ध असताना व ही जाणीव डॉक्टरांना असता अशा रुग्णांमध्ये रोगप्रतिकार क्षमतेचा अभाव असतो. पहिली पिशवी रक्ता दिल्यानंतर साहिल पिवळा जर पडला होता. कमजोर झाला होता. आमच्या जीवनातला हा प्रत्यक्ष व प्रथम अनुभव होता. त्याच्या डोक्यात व छातीत भयानक प्रमाणात त्रास होत होता. आम्ही नर्सला वारंवार सांगू नहीं त्यांचे उत्तर असे होते की तो सिकल रुग्ण आहे. पहाटेला डॉक्टरांचा राउंड होईल तेव्हा सांगा. पहाटे राऊंडवर डॉक्टर दिवाण यांना स्वातंत्र्य बेट व इतरात्री तक्रारी केली असता. त्यांनी हाती पेपर देऊन अपमान जनक शब्दात तातडीने वार्डाच्या बाहेर आम्हास केले. व डे केयरला जाण्यास सांगितले. डे केयर मधून पुन्हा आम्हास वार्ड 6 क्रमांक सहा मध्ये पाठवले. त्यावेळी तिथल्या डॉक्टरांनी सांगितले की साहिल फार पिवळा दिसतो. डॉक्टरांना आपण का विचारत नाही. त्यांनी तीन तपासण्या आम्हास लिहून दिल्या. त्याप्रमाणे ईसीजी सोनोग्राफी व छातीचे एक्स-रे रिपोर्ट त्याप्रमाणे आम्ही रिपोर्ट केले व रिपोर्ट नॉर्मल असल्याचे सांगण्यात आले. पुढील रक्त तपासण्या व आयबीटीसी करण्यात आल्या नाही. परत रक्त दिले. त्याच्या त्रासावर संपूर्ण बेजबाबदारपणे दुर्लक्षित केले. दुसरी रक्त पिशवी देण्यात आली. त्यानंतर पूर्ववत त्रास त्याला तोच सुरू होता. त्याच्या छातीत त्रास वाढला अनेक विनंती केल्यानंतर दिनांक १२/१२/२१ च्या रात्री अंदाजे सुमारास डॉक्टरांना बोलावण्यात आले त्यांनी लहान सलाईन व ड्रामा डोल नार्कोटिक इंजेक्शन नर्सला देण्याचे सांगून ते निघून गेले. सलाईन संपल्यानंतर साहिलचास नाकातून रक्त बाहेर येऊ लागले. पुन्हा डॉक्टरांना बोलण्याची विनंती आम्ही नर्स मॅडम श्रीमती चरडे यांना केली. त्यांनी नाक कान घशाचे डॉक्टर बोलावले वास्तविक अशा आजाराचे उपचार करणारे डॉक्टर हिमोटलॉजिस्ट आवश्यक होते. परंतु त्या डॉक्टरांनी आल्यानंतर कापसाचे बोळे कैचीच्या साह्याने कुच कुचकून दोन्ही श्वासन नलिका साहिलच्या बंद केल्या दिनांक 12 12 ची रात्र सुमारास अंदाजे 12:30 असू शकते नर्सणे विचारले की हे कापसाचे बोळे केव्हा काढायचे. त्यांनी सांगितले की सकाळी पाऊ त्यावेळी नर्स ने आठवण दिली की उद्या रविवार आहे. डॉक्टर म्हणाले सोमवारी काढू त्यानंतर डॉक्टर लगेच निघून गेले. त्यानंतर रक्त तोंडातून येणे सुरू झाले. श्वास घेणे व रक्ताचे गुरळे थूकणे यामध्ये रक्तछाती व पोटात

जात होते साहिल सिकल बीटा थलेसीमीया. याचा रुग्ण होता हा प्रयोग त्याच्यासारख्या रुग्णास जीवघेणा ठरवणारा होता. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे सिकल रुग्णांचे आरबीसी विळ्याच्या आकारात परिवर्तित होतात. त्यामुळे रक्तपुरवठा खंडित होतो. लकवा अथवा हार्ट बंद पडते. त्यावेळी त्याला आईसीयू मध्ये ठेवणे आवश्यक होते. स्पोर्ट ऑक्सिजन पुरवठा करणे व अंडोस्कोपी करणे हे महत्त्वाचे असता संपूर्ण बे जबाबदारपणे ते उपचार करीत होते. ट्रामाडोल इंजेक्सन दिल्या नंतर श्वासन गती कमी होते. त्यानंतर एन्डोस्कोपिक स्कॅन करणे अनिवार्य होते आयसीओ मध्ये ठेवणे आवश्यक होते. सपोर्ट ऑक्सिजन तोंडातून पुरवठा करणे व पॅरामीटर वर ठेवणे हे महत्त्वाचे असता. संपूर्ण बे जबाबदारपणे ते उपचार करीत होते. ट्रामाडोल इंजेक्सन हे श्वासन क्रियेत बाधा निर्माण करतात श्वास गती त्यामुळे कमी होते. अशातच नेझल पॅकिंग करणे अर्थातच त्या व्यक्तीला मृत्यू दंड देणे होए.

साहिल रुग्ण वारंवार नर्स्ला विनंती करत होता त्याना सांगत होता मला श्वास घेण्यात त्रास होतो माझ्या नाकातला कापूस काढा मॅडमने मनाई केली आम्हासही सांगितले की काढू नका पुन्हा डॉक्टर येणार नाही त्यानंतर काहीच वेळात प्रचंड बेदम साहिल ला खोकला सुरू झाला तो वारंवार नर्स्ला विनंती करीत होता नर्स सांगत होत्या की आता डॉक्टर पहाटेच्या राऊंडवरच येईल साहिल घड्याळच्या काट्याकडे नेहमी वारंवार पहात होता पहाट उजळण्याची वाट बघत होता श्वासात खराटे घेत होता तरी नर्स त्याकडे दुर्लक्ष करत होती नर्सचा केबिन पासून दहा फुटाच्या अंतरावर त्याचा बेड होता तो संवाद साधत होता त्याचे प्रत्येक शब्द नर्स एकत होत्या बाबा यांनी हे काय केले माझी संपूर्ण छाती संपली मी वाचू शकत नाही मला कुठेतरी घेऊन चला आर्थिक अभावी आई वडील आम्ही हतबल होतो तो वारंवार नर्स्ला हात जोडून जीवनाची भीक मागत होता मॅडम आता तरी डॉक्टरांना बोलवा काहीतरी करा त्यावेळी मॅडम थोड्या नम झाल्या व त्यांनी सांगितले की माझ्या हातात असते तर मी केले असते मी काय करू शकतो त्यानंतर तो वार्डाच्या बाहेर लगेच गेला प्रयत्न करूनही त्याला लघवी झाली नाही काही वेळ तो वार्डा च्या बाहेरील गारव्यात थांबला पावसाचे थेंब सुरू झाले पुन्हा त्याला बेडवर आणले त्याने पुन्हा अंतिम विनवणी मॅडमला केली नर्सने डॉक्टरांना फोन केला नाही त्यांनी मला मांडीवर घेण्यास सांगितले पुन्हा विचारले बाबा डॉक्टर केव्हा येतील त्यानंतर माझ्या छातीवर मान ठेवत बोलला बाबा माझी पप्पी घ्या मी उत्तर दिले साहिल मी तुला लहानपणापासून तर भरपूर प्रेम दिले त्यांनी त्यावेळी हट्ट केला मी पप्पी घेताच त्याच्या तोंडातून फेस गडू लागला व त्याने जीव सोडला एखाद्या चित्रपटाप्रमाणे नर्स हा सर्वत्र प्रकार बघत होत्या ऐकत होत्या त्यानंतर डॉक्टरांना बोलावण्यात आले दहा मिनिटांनी डॉक्टर आलेत छातीवर कॉम्प्रेशन केले मृत्यू शरीरावर ऑक्सिजन लावून वार्ड क्रमांक सहा मध्ये त्याचे स्वतःच्या मोबाईल मधे फोटो काढले नर्सचा केबिनमध्ये बसून भराभर 15 मिनिटं पेपर लिहू लागले हे पेपर 16 महिन्याने दिनांक 30/04/2022 ला देण्यात आले त्यामध्ये मृत्यू पूर्व पन्नास मिनिटे इमर्जन्सी इंजेक्शन एड्रालाईन दिले असे रेकॉर्डवर दस्तावेज मध्ये लिखित आहे अर्थातच फरजी दस्तावेज घटनाक्रमाच्या आधारित दिलेल्या वेळेप्रमाणे नमूद केले परंतु घटनाक्रम हा अंदाजे व त्या वार्डात चुकीचा वेळ दर्शवणाऱ्या घड्याळावर आधारित आहे तरी सरकारी रुग्णालयातील अशी फर्जा दस्तावेजावर आमचे न्याय प्रकरण चालतात आणि अशावर कायदेशीर कारवाई होने हे महत्त्वाचे असतानी सुद्धा शैली चिकित्सक अधिकारी यानि यांच्यावर कुठल्याही प्रकारची कायदेशीर कारवाई केलेली नाही त्याबाबत आम्ही माननीय विद्यमान हायकोर्टाला एक निवेदन दिलेला आहे व तसेच तक्रार मानव अधिकार कडे केलेली आहे की या संबंधित प्रकरणात व्यक्तीवर श्रीमती चरडे मॅडम व अभिजीत मोरवाल डॉक्टर यांचं नारको टेस्ट होणे गरजेचे आहे कारण की या दस्तावेजावर आज आमचा न्यायपालिका चालते आणि असे प्रकरण आमच्या समाजात घडला नको.